<u>**विशेष खटला क्र.१२२/२०२५ मधील नि.क्र.१९ वरील आदेश**</u>

(CNR NO.MHPU14-001422-2025)

(पारीत दिनांक – २३.०२.२०२६)

१. अर्ज व त्यावरील प्रतिपक्षाचे म्हणणे वाचले.

२. उभय पक्षांच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

३. प्रस्तुत प्रकरणात विद्वान सरकारी अभियोक्ता यांनी दाखल केलेल्या म्हणण्याची प्रत तसेच आरोपी पक्षाकडून दाखल केलेल्या लेखी उत्तराची प्रत फिर्यादी यांना पुरविण्यात यावी अशी विनंती फिर्यादी यांनी केली आहे. त्यावर दि.१६.०२.२०२६ रोजी विद्वान सरकारी अभियोक्ता यांना त्यांच्या म्हणण्याची प्रत पुरविण्यातबाबत आदेश पारीत करण्यात आलेला आहे. त्यानुसार विद्वान सरकारी अभियोक्ता यांनी ते फिर्यादी यांना त्यांचे म्हणण्याची प्रत देण्यास याआधी सुध्दा तयार होते व आजही तयार आहेत असे कथन केले आहे. त्यानुसार विद्वान सरकारी अभियोक्ता यांनी आरोपीचे जामीन अर्जावर दाखल केलेल्या म्हणण्याची प्रत अभिलेखावर सादर केली आहे. त्याचप्रमाणे आरोपी पक्षाने देखील दाखल केलेल्या त्यांच्या अर्ज व म्हणण्याची प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. सबब प्रस्तुत अर्जाचा उद्देश सफल झाल्याने खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

<u>**आदेश**</u>

अर्ज नि.क्र.१९ निकाली काढण्यात येतो.

Digitally signed by HETENDRA ANILKUMAR WANI
Date: 2026.02.24 13:27:53 +0530

**(हितेंद्र उर्मिला अनिलकुमार वाणी)**

दिनांक – २३.०२.२०२६

अतिरिक्त सत्र न्यायाधीश, बारामती.